# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
संकेतस्थळ/Website: www.unipune.ac.in

**परिपत्रक क्र. ६२ /२०२६**

**विषय :** **संशोधक विद्यार्थ्यांच्या अडी-अडचणी संशोधन केंद्र स्तरावर सोडविणेबाबत..**

**संदर्भ :** **१. विद्यापीठ परिपत्रक क्र. २६४/२०२३ दि. ०१ नोव्हेंबर, २०२३**
**२. विद्यापीठ परिपत्रक क्र. ०१/२०२५ दि. ०१ जानेवारी, २०२५**

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये संशोधक विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडी-अडचणींची संशोधन केंद्राच्या स्तरावर निर्गती करण्याबाबत कळविण्यात आले होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रत्येक महाविद्यालयास/मान्यताप्राप्त संस्थेस प्रचलित नियमांच्या आधारे संशोधन केंद्र मान्य केले आहे. सदर संशोधन केंद्रामधील विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या सोयी-सुविधा तसेच इतर आवश्यक प्रक्रियेची माहिती देण्याची जबाबदारी संबंधित संशोधन केंद्रांची, पर्यायाने त्या संशोधन केंद्र प्रमुखाची अथवा प्रमुखांनी नियुक्त केलेल्या समन्वयकाची असते.

सद्यस्थितीत असे निदर्शनास येत आहे की, अनेक संशोधन केंद्रे त्यांच्या संशोधक विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी मदत, सुविधा किंवा विद्यापीठातील इतर कामांसाठी थेट विद्यापीठातील संविधानिक अधिकारी व शैक्षणिक प्रवेश विभागाकडे भेटण्यास पाठवितात. वास्तविक, विद्यार्थ्यांच्या अडी-अडचणी संबंधित संशोधन केंद्रांनी त्यांच्या प्रतिनिधी/कर्मचाऱ्यांमार्फत विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाकडे पाठवून त्याची पूर्तता करणे आवश्यक आहे. परंतु तसे न होता, बहुतांश वेळा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष विद्यापीठाकडे जाण्याचा सल्ला दिला जातो. यामुळे संविधानिक अधिकाऱ्यांचा वेळ वाया जातो तसेच शैक्षणिक प्रवेश विभागाच्या कामकाजामध्ये अडथळे निर्माण होतात. तसेच या प्रक्रियेत संबंधितांना प्रत्यक्षरित्या विद्यापीठात यावे लागत असल्याने त्यांच्यावर विनाकारण आर्थिक भार पडतो व त्यांच्या वेळचासुद्धा अपव्यय होतो.

त्याअनुषंगाने मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित संशोधन केंद्रांना कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या सोयी-सुविधा व मदत संबंधित संशोधन केंद्रामध्येच उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने संशोधन केंद्रप्रमुखांनी नियुक्त समन्वयकांना तातडीने सूचना द्याव्यात. तसेच विद्यापीठाच्या पीएच.डी. संदर्भातील सर्व परिपत्रकांचे अवलोकन करून विद्यार्थ्यांना त्याबाबत अवगत करावे. यापुढे विद्यार्थ्यांच्या पीएच.डी. प्रक्रियेसंदर्भातील प्रशासकीय कामकाजासाठी विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडे न पाठवता, संशोधन केंद्राचे **केंद्रप्रमुख/समन्वयक/प्राधिकृत कर्मचारी** यांनाच शैक्षणिक प्रवेश विभागामध्ये पाठविण्यात यावे.

गणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ: शै.प्रवेश/ ११७५ )
दिनांक: 15/04/2026)

15/4/2026
(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा. विभागप्रमुख/संचालक, विद्यापीठ शैक्षणिक विभाग.
२. मा. प्राचार्य/संचालक, विद्यापीठाशी संलग्नित सर्व संशोधन केंद्रे/संस्था.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
संकेतस्थळ/Website: www.unipune.ac.in


**परिपत्रक क्र. ०१ / २०२५**

**विषय : संशोधक विद्यार्थ्यांच्या अडी-अडचणी संशोधन केंद्र स्तरावर सोडविणेबाबत..**
**संदर्भ : विद्यापीठ परिपत्रक क्र. २६४/२०२३ दि. ०१ नोव्हेंबर, २०२३**

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये संशोधक विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडी-अडचणीची संशोधन केंद्राच्या स्तरावर निर्गती करण्याबाबत कळविण्यात आले होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रत्येक महाविद्यालयास/मान्यताप्राप्त संस्थेस प्रचलित नियमांच्या आधारे संशोधन केंद्र मान्य केले आहे. सदर संशोधन केंद्रामधील विद्यार्थ्यांना आवश्यक असणा-या सोयी-सुविधा आणि इतर आवश्यक प्रक्रियेची माहिती देण्याची जबाबदारी संबंधित संशोधन केंद्रांची, पर्यायाने त्या संशोधन केंद्र प्रमुखाची अथवा त्या प्रमुखांनी नेमलेल्या समन्वयकांची असते.

सद्यस्थितीत असे निदर्शनास येत आहे की, अनेक संशोधन केंद्रे त्यांच्या संशोधक विद्यार्थ्यांना त्यांच्याकडून आवश्यक असणारी मदत, सुविधा किंवा विद्यापीठातील त्यांच्या इतर कामांसाठी परस्पर विद्यापीठातील संविधानिक अधिकारी आणि शैक्षणिक प्रवेश विभागाला भेटण्यास पाठवितात. वास्तविक विद्यार्थ्यांच्या ज्या काही अडी-अडचणी असतील, त्या संबंधित संशोधन केंद्रांनी त्यांच्या प्रतिनिधी/कर्मचारी यांच्यामार्फत विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाकडे पाठवून त्याची पूर्तता करण्याची आवश्यकता आहे. परंतु असे न होता, बहुतकेवेळा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष विद्यापीठाकडे जाण्याचा सल्ला दिला जातो. यामुळे संविधानिक अधिकारी यांचाही वेळ वाया जातो आणि शैक्षणिक प्रवेश विभागाच्या कामकाजामध्येही अनेक अडथळे निर्माण होतात.

त्याअनुषंगाने मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित संशोधन केंद्र यांना कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांना आवश्यक असणा-या सोयी-सुविधा आणि मदत संबंधित संशोधन केंद्रामध्ये उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून संशोधन केंद्रप्रमुखांनी नेमलेल्या समन्वयकांना याबाबत तातडीने सूचना देऊन विद्यापीठाच्या पीएच्.डी. संदर्भातील सर्व परिपत्रकांचे अवलोकन करून विद्यार्थ्यांना त्याबाबत अवगत करण्यात यावे. यापुढे विद्यार्थ्यांच्या पीएच्.डी. प्रक्रियेसंदर्भातील प्रशासकीय कामकाजासाठी **विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडे न पाठवता संशोधन केंद्राचे केंद्रप्रमुख/समन्वयक/प्राधिकृत कर्मचारी** यांनाच शैक्षणिक प्रवेश विभागामध्ये पाठविण्यात यावे.

गणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ: शै.प्रवेश/ ०१ )
दिनांक: ०१/०१/२०२५ )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**
मा. विभागप्रमुख/संचालक, विद्यापीठ शैक्षणिक विभाग
मा. प्राचार्य/संचालक, विद्यापीठाशी संलग्नित सर्व संशोधन केंद्रे/संस्था.

D:\General Circulars\General Circulars.docx

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. 264 /2023**

**विषय : संशोधक विद्यार्थ्यांच्या अडी-अडचणी संशोधन केंद्र स्तरावर सोडविणेबाबत..**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रत्येक महाविद्यालयास/मान्यताप्राप्त संस्थेस प्रचलित नियमांच्या आधारे संशोधन केंद्र मान्य केले आहे. सदर संशोधन केंद्रामधील विद्यार्थ्यांना आवश्यक असणा-या सोयी-सुविधा आणि इतर आवश्यक प्रक्रियेची माहिती देण्याची जबाबदारी संबंधित संशोधन केंद्रांची, पर्यायाने त्या संशोधन केंद्र प्रमुखाची अथवा त्या प्रमुखांनी नेमलेल्या समन्वयकाची असते.

सद्यस्थितीत असे निदर्शनास येत आहे की, अनेक संशोधन केंद्रे त्यांच्या संशोधक विद्यार्थ्यांना त्यांच्याकडून आवश्यक असणारी मदत, सुविधा किंवा विद्यापीठातील त्यांच्या इतर कामांसाठी परस्पर विद्यापीठातील संविधानिक अधिकारी आणि शैक्षणिक प्रवेश विभागाला भेटण्यास पाठवितात. वास्तविक विद्यार्थ्यांच्या ज्या काही अडी-अडचणी असतील, त्यासंबंधित संशोधन केंद्रांनी त्यांच्या प्रतिनिधी/कर्मचारी यांच्यामार्फत विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाकडे पाठवून त्याची पूर्तता करण्याची आवश्यकता आहे. परंतु असे न होता, बहुतकेवेळा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष विद्यापीठाकडे जाण्याचा सल्ला दिला जातो. यामुळे संविधानिक अधिकारी यांचाही वेळ वाया जातो आणि शैक्षणिक प्रवेश विभागाच्या कामकाजामध्येही अनेक अडथळे निर्माण होतात.

त्याअनुषंगाने मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित संशोधन केंद्र यांना कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांना आवश्यक असणा-या सोयी-सुविधा आणि मदत संबंधित संशोधन केंद्रामध्ये उपलब्ध होण्याच्या दृष्टकोनातून संशोधन केंद्र प्रमुखांनी नेमलेल्या समन्वयकांना याबाबत तातडीने सूचना देऊन विद्यापीठाच्या पीएच.डी. संदर्भातील सर्व परीपत्रकांचे अवलोकन करून विद्यार्थ्यांना त्याबाबत अवगत करण्यात यावे. यापुढे विद्यार्थ्यांच्या पीएच.डी. प्रक्रिये संदर्भातील प्रशासकीय कामकाजासाठी संशोधन केंद्राचे **केंद्रप्रमुख/समन्वयक/प्राधिकृत कर्मचारी** यांनाच शैक्षणिक प्रवेश विभागामध्ये पाठविण्यात यावे, ही विनंती.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

संदर्भ: शै.प्रवेश/4434
दिनांक: 01/11/2023
**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**
मा. प्राचार्य/संचालक, विद्यापीठाशी संलग्नित सर्व संशोधन केंद्रे/संस्था.

C:\Users\pgedm\OneDrive\Desktop\General Circulars.docx